## प्रकरण तिसरे

## स्त्री शिक्षण

## प्रकरण तिसरे

## स्त्री शिक्षण

आगरकर व टिळक यांच्या काळात उपस्थित झालेला महत्वाचा सामाजिक विषय म्हणजे स्त्री शिक्षण व स्त्री सुधारणा होय. गोपाळ गणेश आगरकरांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केलेला आपल्याला दिसून येईल. गृहस्थिती अगोदर सुधारली तरच देशाची सर्व स्थिती सुधारेल असे आगरकर म्हणत, बालविवाह, केशवपन, असंमत वैधव्य इत्यादी अमानुष रूढीमुळे आमची गृहस्थिती बिघडली होती. त्या रूढीच्या मागे अत्यंत अमानुष अशी विचारसरणी होती आणि त्याचप्रमाणे ढोंगी व अंध अशी प्रवृत्तीही होती. प्रत्यक्ष या रूढीपेक्षाही ती विचारसरणी व ती वृत्ती या समाजाला जास्त घातक होती. म्हणूनच अगोदर गृहस्थिती सुधारली पाहिजे असा आगरकरांचा आग्रह होता व ती सुधारावयाची असेल तर स्त्री जीवनाची स्थिती आधी सुधारली पाहिजे, असे ते म्हणत. ही स्त्री जीवनाची स्थिती सुधारण्यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणजे स्त्रीशिक्षण हा होय, असे त्यांनी सांगितले होते.

लोकमान्य टिळकांचे या विषयावरील विचार पुण्यातील फिमेल हायस्कूलमधील शिक्षणक्रम, अबलोन्नती पुस्तकावरील लेखमाला, महर्षी कर्वे यांनी काढलेल्या विद्यापीठासंबंधी त्यांनी लिहिलेले लेख, पुनर्विवाहविषयक विविध लेख यामधून प्रामुख्याने आढळतात. टिळकांच्या सर्व लेखनात वर्तमान-पत्र लेखनातील तत्कालिन अभिनिवेश, प्रतिपक्षियांचा युक्तीवाद हाणून पाडण्यासाठी उपस्थित केलेले मुद्दे आणि व्यावहारिक प्रत्यक्षवस्तुनिष्ठ दृष्टिकोन आढळतोच. समाजाच्या दिर्घकालीन रचनेपेक्षा तातडीच्या प्रश्नाकडे

टिळकांचे लक्ष जास्त आढळते. त्यामुळेच त्यांच्या लेखनाला सामाजिक पूर्वनिश्चित तत्वविचाराची बैठक आढळत नाही हेच टिळकांच्या स्त्री शिक्षण विचाराबाबत झालेले दिसते. १ टिळक स्वत:ची स्त्री शिक्षण विषयक भूमिका स्पष्ट करताना सुधारकांना सांगत," पाश्चात्य विद्येच्या परिशीलनाने सुधारणेच्या अत्युच्च कल्पना तुमच्याच मात्र मेंदूत ओठल्या गेल्या आहेत. तर तुम्हाला आमचे इतकेच सांगणे आहे की, तुम्ही ज्या कालामध्ये पाश्चात्य विद्येचे अध्ययन केले तो काल व आजचा काल अगदी भिन्न आहे. पाश्चात्य विद्येच्या जास्त प्रसाराने म्हणा, किंवा तुम्ही जी कामे गेल्या पाचपंचवीस वर्षांत हाती घेतलीत व त्यांत तुम्हांस जे यश प्राप्त झाले व तुमचा जो दृढनिश्चय लोकांच्या नजरेस आला त्यामुळे म्हणा, सुधारणेचे अत्युज्ज्वल स्वरूप जरी तुम्हां-आम्हाला एकच दिसत असले तरी यासंबंधी तुमच्या-आमच्यात बहुधा अपरिहार्य मतभेद आहे. संसाररूपी शकटाची गती स्त्री व पुरुष या दोन चक्राच्या आधीन आहे व त्यातील एक चक्र मागे पडले तर तो शकट खड्ड्यात पडेल. स्त्री ही पुरुषाची सहधर्म-चारिणी आहे, म्हणून तिच्या सहाय्यावाचून पुरुष एकटाच पुढे जाऊ म्हणेल तर ते कधीही शक्य होणार नाही. शिक्षणाने ज्याप्रमाणे पुरुष बिघडले त्याप्रमाणे स्त्रियाही बिघडयाचा संभव नाही. दोन-चार किंवा दहा-पांच शतकात स्त्रिया पुरुषांप्रमाणे स्वतंत्र होऊन रोजगार धंदे करु लागतील, विवाहदास्य जाऊन त्याठिकाणी समय स्वतंत्रता येईल व राष्ट्राची दोन्ही अंगे सुशिक्षित व उद्योगी झाल्याने राष्ट्र सुसंपन्न होऊन उन्नतीस येईल वगैरे. गोष्टीबद्दल आमची बिलकुल तक्रार नाही. आमचा सद्या प्रश्न इतकाच आहे की हल्ली आमच्याकडे स्त्रियांची जी स्थिती आहे ती सुधारण्यास व विशेषत: त्यास शिक्षण देण्यास आज कोणता उपाय करावा ? हा प्रश्न सद्य:स्थितीत इतका आकुंचित झाला आहे की, तुमच्या सुधारणेच्या तत्वांची येथे कांही जरुरी नाही. परंतु आमच्या सुधारक मतास

अजून हा भेद कळत नाही. हे आपले किंवा त्यांचे एक मोठे दुर्भाग्यच समजावयाचे." २

स्त्री शिक्षण क्रमाचा विचार करताना टिळक फक्त मध्यमवर्गीय स्त्रीयाचा विचार करीत किंबहुना विवाहित स्त्रियांना शिक्षण कसे देता येईल, याचाच त्यात जास्त विचार असे. त्यातही इंग्लंडप्रमाणे व्यावसायिक दृष्टया स्वतंत्र असलेल्या, अर्थार्जन करणाऱ्या स्त्रियाही या सुधारणेतून जन्माला येतील हे टिळक मान्य करीत. त्यांच्यापुढे सुधारलेल्या व स्वावलंबी स्त्रीचे चित्र होते. त्यांनी म्हटले होते, "इंग्लंडसारख्या देशांत काही स्त्रिया पुरुषाप्रमाणे स्वतंत्र व्यवसाय करण्याकरीता उच्च शिक्षणाची अपेक्षा करतात व पुढे पुरुषाप्रमाणे वकिलीचा, वैद्याचा, एडीटरचा किंवा कारकुनीचा व्यवसाय त्या करू लागतात. स्त्रियांनी अशा तऱ्हेने पुरुषांप्रमाणे स्वतंत्र धंदे करून त्यांनी पुरुषांच्या दास्यांतून मुक्त होऊ नये असे आम्ही बिलकूल म्हणत नाही. तथापि हा वर्षशतकांचा किंवा सहस्त्रांचा प्रश्न आहे. तेथे प्रौढविवाह जारीने चालतात आणि विवाहसंबंध बहुतेक कराररूपी झाला आहे, अशा पाश्चात्य राष्ट्रातही स्त्रियांनी स्वतंत्र व्यवसाय करण्याचा प्रचार नुक्ताच सुरु झाला असून तेथे फिमेल कॉलेजची स्थापना किंवा पुरुष कॉलेजात स्त्रियांचा प्रवेश गेल्या पाचपंचवीस वर्षांतच झाला आहे. पण आमच्या सुधारकांस ही गोष्ट ठाऊक नाही असे नाही. परंतु त्यांना तिकडील सुधारणेचे ताजे लोणी एकदम चाटण्याची अत्युत्कट इच्छा उत्पन्न झाली असावी. शिवाय आमच्याकडची समाजस्थिती पाहता गृहकृत्ये सोडून स्त्रिया स्वतंत्र व्यवसाय करू लागण्यास अजून कित्येक शतकांचा अवधी आहे. गृहकृत्याचे ओझे जिच्यावर पडत नाही अशी एखादी श्रीमंत स्त्री आजही पुरुषांप्रमाणे शिकून ग्रंथकार होण्याची इच्छा धरेल, पण श्रीमंत व उद्योग यांचा आमच्याकडे तरी अन्योन्य प्रतियोगी

संबंध असल्यामुळे अशी उदाहरणे फारच विरळ आहेत. त्याचप्रमाणे युरोपियन आहारविहारांचे व ललीत कलांचे ज्यांस संसारात सुख घेता येईल अशांचीही संख्या कमीच आहे. तेंव्हा ज्या फिमेल हायस्कूलांतील शिक्षण पुरुषांप्रमाणे असून युरोपियन त-हेवर आहे त्या शाळेचा दहा-यांच श्रीमंत लोकांखेरीज कोणासही उपयोग नाही. आमच्या स्त्रियांना लिहिता-वाचतां येऊन त्यांना गृहकृत्ये चांगल्या त-हेने करण्याचे शिक्षण मिळावे, राहिलेल्या वेळांत पुराणादि वाचून त्यांनी आपली आत्मोन्नती करावी व आपणांस संसारात मदत करावी हे प्रत्येक मध्यम स्थितीतल्या सुशिक्षित पुरुषांची इच्छा आहे." [3] लोकमान्य टिळकांनी समाजातील विवाहीत स्त्रियांच्याच शिक्षणाचा पुरस्कार केलेला दिसून येतो. सर्व स्त्रियांच्या शिक्षणाचा त्यांनी पुरस्कार केलेला दिसून येत नाही.

गो. ग. आगरकरांनी मात्र लहान मुलींच्या शिक्षणापासून ते मोठ्या स्त्रियांच्या शिक्षणाचा विचार केलेला दिसून येईल. आगरकरांच्या मते, लहान मुलांच्या शिक्षणाबद्दल सरकारने जितकी सक्ती केली पाहिजे तितकी मुलींच्या शिकवण्याबद्दलही केली पाहिजे, किंबहुना मुलींच्या शिकवण्याबद्दल थोडीशी अधिक केली पाहिजे. कारण अपत्यसंगोपनाची खरी जबाबदारी आईवरच असते. आईच्या प्रकृतीचे, स्वभावाचे व आचरणाचे परिणाम मुलाच्या प्रकृतींवर थेट गर्भाधानापासून होत असतात. बायकोच्या व मुलांच्या चरितार्थास लागणारे द्रव्य बाप संपादितो, मुले आजारी असली तर तो त्यांची थोडीबहुत काळजी घेतो, बाहेर थकला भागलेला घरी परत आल्यावर त्यांचे लाड करतो, व त्याने ते करणे जरुरीचे आहे. पण मुले स्वावलंबी होईपर्यंत त्याबद्दल जी अहोरात्री खस्त खावी लागते ती आईलाच. पापणीला पापणी लागू न देतां उभ्या रात्री जागून काढणे, मोठाच्या

मोठा धुणी धुणें, कोणत्याही प्रकारच्या देहधर्मास कधीही कंटाळून न जाणे. तात्पर्य आपल्या प्राणापेक्षा ज्याला आपण पोर म्हणतो त्यास जपणे हे अवघड काम स्त्रीच करते व तीच करू शकणार आहे. पुरुषांना अशी कामे अजिबात जमणार नाहीत. तेंव्हा ज्या स्त्रीवर अपत्य संगोपनाचे काम आपण सोपवितो त्या स्त्रिला अक्षरशत्रु ठेवणे हे अत्यंत अहितकारक आहे असे आगरकरांना वाटत होते. संसार चालविण्याची जबाबदारी पुरुषांवर असली तरी मुलाला जन्म देऊन त्यांच्या शरीराची वमनाची जोपासना करण्याचे काम स्त्रीच करीत असते. ज्या स्त्रिला प्राथमिक शिक्षण मिळाले आहे ती स्त्री अशिक्षित स्त्रीपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे अपत्य संगोपन करू शकेल असे आगरकरांना वाटत होते. आगरकरांच्या मते वीस स्त्रियांपैकी दहांना थोडेबहुत शिक्षण मिळाले आणि दहांना त्याचा स्पर्शही झालेला नाही अशी स्थिती कोठे असेल तर तेथे शिकलेल्या स्त्रियांच्या मुलांचे संगोपन विशेष चांगल्या रीतीने होत असून एकंदरीत त्यांचे संसारही अधिक चांगल्या पध्दतीने होतात असे आपल्याला आढळून येईल. लहानपणी मुलींची लग्ने केली म्हणून काय होते ? स्त्रियांना स्वातंत्र्य नसले म्हणून काय होते ? स्त्रियांना अक्षरशत्रु ठेवल्या म्हणून काय होते ?" अशा निरर्गल प्रलाप करणाऱ्या विचारशुन्य, मतलबी किंवा मत्सरी लोकांचो तोंडे एकदम बंद करता येत नाहीत याचे कारण असे की, राजकीय, धार्मिक व सामाजिक गोष्टीत पदार्थविज्ञान शास्त्रांतल्या प्रयोगासारखे तत्कालिन खात्री करून देणारे प्रयोग करता येत नाहीत. या गोष्टीतील बराच भाग अनुमानावर सोपवावा लागतो, आणि हा पंथ एकदा पत्करला म्हणजे मग पाहिजे त्याने पाहिजे तसे बहक्त सुटावे अशी अनावस्था होऊन जाते. अमेरीकेत व युरोपमध्ये लोकशिक्षण व स्त्री-शिक्षण या संबंधाने वाद निर्माण झालेला दिसून येतो. परंतु त्यांच्यात हा वाद समझोत्याने मिटला गेला. प्राथमिक शिक्षणासंबंधी तरी तेथे आता फारसा मतभेद राहिलेला दिसून येत नाही. प्रत्येक मुलीला किंवा

मुलाला चौदाव्या वर्षापर्यंत कोणाकडून तरी अमुक ज्ञान प्राप्त झाले आहे, हे पाहण्याची जबाबदारी सरकारने किंवा संस्थानाने आपल्या शिरावर घेतली पाहिजे असे सारे लोक कबुल करतात. येथे अजून हा वाद निर्माण झालेला नाही. ४ त्याकाळी समाजात एकंदरीने स्त्रियांना जी वागणूक मिळत होती तीच आगरकरांना उद्वेगजनक वाटत होती. "मराठमोळ्याची पुरवणी" या लेखात ते मोठया तळमळीने लिहितात की, "पुरुषांनी बायका ह्या केवळ प्रजोत्पादनाची हिंडती फिरती यंत्रे आहेत असे समजू नये. बायकांना बुध्दी नाही की मन नाही, की रुची नाही, की बरेवाईट समजण्याची अक्कल नाही. पुरुषांपेक्षा त्यांच्यात काय कमी आहे ? .... बायकोला कोंडून ठेवून तिच्या पतिव्रत्याची बढाई मिरविणारा, पौरुषाभावामुळे ब्रह्मचर्याची ऐट मारणाऱ्यासारखा होय. व्यवहारात मोकळेपणी वागत असता ज्या मोहक गोष्टी वारंवार भेटतात, त्यांना चुकवून किंवा टाळून जी आपल्या नवऱ्याला चिकटून राहिली ती खरी साध्वी आणि अशा साध्वीच्या साध्वित्वाचा अभिमान असणे योग्य आहे. ज्याला आपल्या बायकोने आपल्याशी इमानी रहावे असे वाटत असेल त्याने तिच्यावर अंत:करणापासून प्रीती करावी."[५] वरील उताऱ्यावरून समाजात आगरकरांच्या काळी स्त्रियांना कशा प्रकारे लेखीत हे सुस्पष्ट होईल. आगरकरांच्या मते, "स्त्रियांनी व पुरुषांनी पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणे करावा, पाहिजे ती विद्या हवी तितकी संपादावी, पाहिजे त्या परीक्षा द्याव्यात व पदव्या मिळवाव्यात आणि पाहिजे तेव्हा लग्न करून संसार करावा." लोकमान्य टिळकांना मात्र हे इश्वरचे चित्र आक्षेपार्ह वाटत नव्हते. फक्त ते आता शक्य नाही हेच त्यांचे म्हणणे होते. टिळकांच्या स्त्री शिक्षणाला विरोध नव्हता. टिळकांच्या मते स्त्री शिक्षण ज्यांस खरोखरच आवश्यक वाटते आहे असे आज पुष्कळ लोक आहेत. परंतु ते शिक्षण आपल्या समाजाची सद्य:स्थिती मनांत आणतां कोणत्या तऱ्हेचे असावे याविषयी मात्र बराच मतभेद आहे, व तो मतभेद खूप

महत्वाचा आहे. फिमेल हायस्कूलच्या संबंधाने आज दोन पक्ष निर्माण झाले आहेत. स्त्री शिक्षण दोघांसही हवे आहे, पण त्यांचे मार्ग भिन्न भिन्न असल्यामुळे दोघांत मतभेद निर्माण झाला आहे. लोकमान्य टिळकांच्या मते, आमच्या स्त्रियांना शिक्षण द्यावे असे जरी पुष्कळ वाटत असले तरी आपल्या समाजाची स्थिती मनात आणून ते शिक्षण आपल्याकडे कोणत्या त-हेने दिले असता लोकमान्य होईल याचा विचार त्या कामात पडणा-या लोकांनी प्रथम केला पाहिजे. लोकमत मागे पडले असल्यास ते सुधारून घेण्याचा प्रयत्न करा, पण त्यास सोडून जाऊ नका. मनुष्य जातीचे अर्धांग अशिक्षित राहिल्यास त्या दोघांचा मिलाफ कधीही व्हावयाचा नाही. ही गोष्ट सर्वांना कबूल आहे. पण त्यामुळे दुस-या अंगास आज पहिल्या अंगास द्यावयाचे तेच शिक्षण देऊ म्हटल्यास कोणी ऐकणार नाही. स्त्री व पुरुष ह्यांची कर्तव्ये या जगात भिन्न भिन्न आहेत व त्यामुळे कधीही एकाचे शिक्षण दुस-याशी जुळणार नाही. पण हा परिणामांचा भेद झाला. तत्पूर्वी देशकालानुरोधाने या दोन्ही शिक्षणात भेद अवश्य केला पाहिजे व तो जितका आमच्या देशात आवश्यक आहे, तितका फिमेल हायस्कूलच्या उत्पादकांच्या हातून केला गेला नाही असे टिळकांचे म्हणणे होते. [६] टिळकांच्या मते, त्या हायस्कूलच्या चालकांमध्ये व आमच्यांमध्ये जो भेद आहे तो उद्देश वैचित्र्याने नव्हे, तर मार्गवैचित्र्यामुळे पडला आहे. स्त्रियांच्या हायस्कूलमध्ये हल्ली जे शिक्षण मिळते त्यांत व पुरुषांस जे त्यांच्या शाळांतून मिळते त्यांत फारसा भेद नाही व जर स्त्री पुरुष यांची आमच्या समाजातील कर्तव्ये मनात आणली तर असल्या शिक्षणां-पासून स्त्रियांस विशेष फायदा न होतां, त्यांस तसे शिक्षण जुलमाने दिल्यामुळे, समाजाचे अहित होणार आहे. टिळकांच्या मते मुख्य उद्देश एक असून साधनासंबंधाने मनुष्यामनुष्यांत मतभेद असणे अगदी स्वाभाविक असतांही आमच्या इकडील "सुधारकांस" त्याचा प्रतिक्षणी इतका विसर पडावा, हे

अगदी चमत्कारीक आहे. आजपर्यंत अशी स्थिती असे की, एकाने सुधारणा हवी म्हणावे व दुसऱ्याने नको म्हणावे. पहिल्या वर्गात तत्कालिन बहुतेक आंग्लविद्याविभूषीत लोक असत व दुसऱ्यांत बाकीच्यांचा अंतर्भाव होत होता. अशा वेळी एक पक्ष दुसऱ्यास असंस्कृत ठरवून आपलाच पक्ष समप्रमाण आहे, अशी द्वैधी वृत्ती व्हावी ही गोष्ट एकार्थी चांगली नाही हे मला मान्य आहे. तथापि एकी व्हावयाची असल्यास कोणत्या पक्षाने कोणाकडे जावे, हा एक मोठाच प्रश्न असल्यामुळे या प्रश्नाची तडजोड कशी होईल याची मला शंकाच आहे. तात्पर्य अशा बाबतीत मतभेद असणे हे जितके स्वाभाविक आहे, तितकेच तो राहणेही आवश्यक आहे असे टिळकांना वाटत होते. टिळकांच्या मते, दोन्ही पक्षांचे हेतू चांगले असतील व दोघोंनाही एकच विषय उद्देश असेल, तरीही त्या दोन्ही पक्षात साधन मतभेदांमुळे मतभेद हा राहणारच, व या दोन्ही पक्षांच्या तडजोडीने जी सुधारणा होईल तीच कायमची असे आम्ही समजतो. असा युक्तीवाद टिळकांनी केलेला आढळतो. टिळकांच्या मते, मतभेदासंबंधी हा सामान्य प्रकार झाला. आता स्त्री शिक्षणाच्या संबंधाने हा मतभेद कां सापडतो याचा थोडासा विचार करू. स्त्रियास शिक्षण दिले असता त्या आपली कर्तव्ये करण्यास अधिक योग्य होतील, हे दोन्ही पक्षांस कबूल आहे. परंतु आपल्या समाजांत ती कर्तव्ये कोणती व आपल्या समाजाची बंधने मनात आणता ती कर्तव्ये करण्यास कोणत्या प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता आहे व ते कोणत्या प्रकारे देता येईल, या बाबतीत दोन्ही पक्षांच्या मतात बरेच भेद आहेत.[७]

टिळकांच्या मते, स्त्री शिक्षणाची कल्पना आमच्या देशात तरी नवीन नाही, तरी तिचा उद्भव इंग्रजी शिक्षणाने झाला आहे, असे म्हणण्यास काही हरकत नाही. पूर्वी काही स्त्रिया पुरुषांप्रमाणे विद्यासंपन्न झाल्याची उदाहरणे आमच्या पुराणांतून आढळतात. परंतु

पुरुषाप्रमाणे स्त्रियांस शाळांत पाठवून तेथे त्यांस "उदार" शिक्षण देण्याची कल्पना आम्ही इंग्रजांपासून घेतली आहे व इतर ज्या कल्पना आम्ही इंग्रजांपासून घेतल्या त्यांच्या प्रथमावस्थेत ज्याप्रमाणे आम्ही चकलो होतो त्याप्रमाणे येथेही स्थिती झाली आहे. टिळकांच्या मते इंग्रजी राज्य व विद्या जर आमच्या येथे आणखी शे-दोनशे वर्षे राहिली तर आमच्या निदान इंग्रजी विद्या शिकलेल्यांची गृहस्थिती इंग्रजी नमुन्यावर काही अंशी जाईल याबद्दल मला फारशी शंका किंवा भिती वाटत नाही. मनुष्याची कोणतीही अवस्था स्थिर नसून त्यामध्ये देश, काल, राजा यांच्या अनुरोधाने फेरफार झालाच पाहिजे. परंतु समाजस्थितीचा विचार न करता एकदम दहा-पाच नव्या गोष्टी प्रचारात आणण्याचा प्रयत्न केला असता तो कधीही सफल व्हावयाचा नाही. इंग्रज लोकांची गृहस्थिती निराळी व आमची निराळी व त्या मानाने आम्हांस शिक्षणही निरनिराळे पाहिजे. ज्या देशांत मुलींचे विवाह लहानपणी न होता त्यास तरुणपणी निदान कांही वर्षेतरी पित्याच्या घरी घालवावी लागतात, त्या देशात मुलीस काही धंदा किंवा विद्या येत असल्यास त्यांचे ओझे आई-बापांवर पडत नाही व विवाह उशीराने झाल्यामुळे एखादा धंदा किंवा विद्या शिकण्यासही त्यांना पुष्कळ वेळ असतो. आपल्या देशात ज्याप्रमाणे आपला मुलगा मोठा झाल्यावर तो आपल्या संसाराचे ओझे आपणावर पडू देणार नाही अशी आपण अपेक्षा करतो, त्याचप्रमाणे अमेरिका व इंग्लंडसारख्या सुधारलेल्या देशांत एखादास चार-पाच अविवाहीत मुली असल्यास त्या लग्न होईपर्यंत कांही तरी धंदा करून कुटुंबास मदत करीत असतात व जर ते कुटुंब गरीब असेल, तर तसे करणे त्यांना जरूरीचेही असते. अशा समाजस्थितीत स्त्रियांस ज्या शिक्षणाची आवश्यकता आहे, तिचा आमच्याकडे काय उपयोग होणार ?[8] टिळकांच्या मते, आमच्या इकडील मुलींची लग्ने निदान ऋतू प्राप्त होण्यापूर्वी तरी झालीच पाहिजेत व लग्ने झाल्याबरोबर त्यांना पतिगृही जावेच लागते. सारांश, अमेरिका इंग्लंड-

सारख्या देशातील मुलींप्रमाणे पितृगृही काम नाही व पतिगृह प्राप्त झाले नाही अशी त्यांची कधीच स्थिती नसते. तेंव्हा आमच्या स्त्रियांस जे शिक्षण द्यावयाचे ते स्वतंत्र धंदा करता यावा म्हणून नव्हे, तर संसारात जी काही त्यांची कर्तव्ये आहेत तीच त्यांना चांगली करता यावीत यासाठी द्यावयाचे. ज्या शाळेत हे शिक्षण मिळत नाही तिचा आम्हाला कांही एक उपयोग नाही व तिची भरभराटही कधी होणार नाही. कित्येक लोकांच्या मते असे आहे की, ज्याप्रमाणे इंग्रजी विद्येच्या संस्काराने आपण आपल्या जुन्या रीतीभातीवर पाणी सोडण्यास तयार झालो आहोत, त्याप्रमाणेच जर स्त्रियांस शिक्षण दिले तर मग साहेब आणि मॅडम दोघेही बुट-स्टॉकिंग चढवून बॅंडगार्डनची हवा खाण्यास जाण्यास तयार होतील. पण हा समज अगदी चुकीचा आहे. हल्ली इंग्रजी विद्येने पुरुषांच्या मनावर जे परिणाम होत आहेत व त्यांच्या हातून जे अनावर वर्तन होत आहे, व ते कितपत स्पृहणीय आहे याचा वाद आहे, तर जे शिक्षण पुरुषासही हित-कारक आहे की नाही याचा संशय आहे, तेच शिक्षण जर स्त्रियांना दिले तर त्याचा परिणाम दुप्पट अहितकारक होईल. यात शंका नाही. ज्या सुधारलेल्या देशांचे आपण अनुकरण करू इच्छितो, तेथे सुद्धा स्त्रियांना वरिष्ठ प्रतीचे शिक्षण गेल्या पांच-पंचवीस वर्षांतच मिळू लागले आहे. मग त्याची आपल्या इकडे एवढी घाई कशाला करायची. पुढे टिळक असेही म्हणतात की, आपले विवाह प्रौढपणी होऊ लागले, आपली विभक्त कुटुंबावस्था मोडून गेली, आपली धर्म व निति यांची जुनी बंधने शिथिल झाली, व आपल्याकडील मध्यम स्थितीतील गृहस्थ लोक दोन पैसे संग्रही राखून राहू लागले. म्हणजे तुमच्या इंग्रजी शिकलेल्या, पियानोवर सुस्वर गाणाऱ्या, व किंडर गार्टन डान्स नाचणाऱ्या व सीता, अहिल्याबाई यांच्या ऐवजी ग्रेस डार्लिंग व एलिझाबेथ यांच्या गोष्टी सांगणाऱ्या स्त्री हायस्कूलातील निघालेल्या मुलींस किंमत येईल परंतु हे मला बिलकूल मान्य नाही. थोडेसे

लिहिता-वाचता येणा-या मुली आज आम्हाला हव्या आहेत व ज्या स्कूलच्या शिक्षणाने आमच्यावर आमच्या देशबांधवांवर परिणाम होतात त्याची आम्हाला अजिबात जरूरी नाही. सासरी किंवा माहेरी राहून रोज घरचे थोडे बहुत काम करून मधल्या वेळांत दोन-तीन तास स्त्री धर्मास व हिंदू धर्मास उचित असे स्त्रियांस शिक्षण देण्याचे जर कोणी मनात आणले, तर ती गोष्ट साध्य आहे. पण जेथे सर्व धर्मांच्या मुली एकत्र करून त्यांना पुरूषांप्रमाणे ११ ते ५ वाजेपर्यंत इंग्रजी बाई आंग्लभौम शिक्षण देणार व ती शाळा एका अति श्रीमंताच्या किंवा अनाथ झाल्यामुळे कांही-तरी धंदा करण्याची ज्यास जरूरी आहे अशा स्त्रियांच्या उपयोगी पडणार. मात्र मध्यम स्थितीच्या गृहस्थास त्या शाळेपासून कांहीएक उपयोग होणार नाही, इतकेच नव्हे तर, उलट त्यापासून उपद्रव मात्र होईल. टिळकांच्या मते, कित्येकांचे म्हणणे असे आहे की, प्रौढ विवाहाची चाल आपल्याला जर प्रचारांत आणावयाची असेल, तर स्त्रियांना इंग्रजी शिक्षण दिल्याने त्या कामात मदत होईल. परंतु हा समाज अगदी अविचाराचा आहे. आजच्या स्थितीत लोकांना रूचेल त्या प्रकारचे स्त्री शिक्षण प्रथमत: सुरू करा. हळूहळू त्यांत समाजाच्या कलाप्रमाणे सुधारणा केल्या म्हणजे इष्ट हेतू साध्य होईल. नाहीतर वर सांगितलेल्या एक-दोन वर्गाखेरीज तुमच्या हायस्कूलकडे कोणीही ढुंकून पाहणार नाही व समाज सुधारणा एकीकडेच राहून तुम्ही मात्र स्वत:ला समाजापासून तोडून घ्याल.

फिमेल हायस्कूलचा उद्देश स्पष्ट करण्यासाठी टिळकांनी पुढील विचार व्यक्त केलेले आढळून येतात. टिळकांच्या मते, कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी ती करण्याचा उद्देश काय व तो सिद्ध होण्यास कोणत्या उपायांची योजना करावी यांचा पुरता विचार करूनच मग त्या गोष्टीची सुरूवात होत असते. फिमेल हायस्कूलच्या उत्पादकांनीही याचा नीट विचार करूनच या हायस्कूलची

उभारणी केली असावी. हायस्कूलपासून लोकांना होणाऱ्या उपयोगाबद्दल ज्या अर्थी आज बराच मतभेद आहे, त्याअर्थी फिमेल हायस्कूलच्या उद्देशांचा व साधनांचा पुन: एकदा विचार करणे जरूरीचे आहे. तसेच हे हायस्कूल जेव्हा स्थापन झाले तेव्हा स्त्रियांना शिक्षणच नको असे म्हणणारे बरेच लोक असल्यामुळे स्त्री शिक्षणाच्या आवश्यकतेबद्दलचाच वाद निर्माण झाला होता. ज्यावेळी फिमेल हायस्कूलची स्थापना झाली त्यावेळी साधनवैचित्र्यामुळे उत्पन्न होणाऱ्या मतभेदांची त्या वेळेस फारशी चर्चा झाली नव्हती. परंतु नंतर ती निर्माण झाली व एवढया प्रयत्नाने स्थापन केलेल्या प्रतिवर्षी खाजगी व सरकारी मिळून इतके रुपये ज्यासाठी खर्च होतात त्या शाळेचा खरोखर लोकांना कितपत उपयोग होतो, असा प्रश्न स्वभावत:च निर्माण झाला. टिळकांच्या मते, आमच्याकडे मुलांप्रमाणे मुलींच्याही शाळा स्थापन होऊन आज बरीच वर्षे झाली आहेत व त्या बहुतेक आता सुरळीत चालू लागल्या आहेत. मुलांच्या मानाने पाहता मुलींच्या शाळेतून सुधारणा होण्यास अजून बरीच जागा आहे. त्याकरिता नवीन स्कूलच्या स्थापनेची कांही जरुरी नव्हती. तसेच मुलींच्या शाळेवर असणारे अधिकारीही स्त्रियांच असाव्यात या उद्देशाने फिमेल हायस्कूलपूर्वी फिमेल ट्रेनिंग कॉलेजचीही आमच्याकडे स्थापना झाली होतीच. तेव्हा फिमेल हायस्कूलच्या स्थापनेचा उद्देश निराळाच असला पाहिजे. फिमेल हायस्कूलची निर्मिती आमच्या लहान मुलीकरतांही नव्हे व मास्तरणी होऊ पाहणाऱ्या स्त्रियांकरताही नव्हे. व हायस्कूल ही एक शाळा असल्यामुळे व दुसऱ्या काही कारणांमुळे हायस्कूलच्या व्यवस्थापकांनी त्या शाळेत वरील दोनही वर्गांची सोय केली आहे. परंतु या शाळेचा "नवीन हायस्कूल" या नात्याने जेव्हा आपण विचार करतो तेव्हा या हायस्कूलमध्ये सामील केलेली मुलींची शाळा, प्रिपरेटरी क्लास, पहिली व दुसरी यत्ता व मास्तरणीचा धंदा शिकवण्याकरिता आलेल्या गरीब किंवा अनाथ स्त्रियांना एकीकडे ठेवले पाहिजे. यांच्यासाठी

या हायस्कूलवर इतके पैसे खर्च करण्याची जरूरी नाही व खर्च होत असलेल्या पैशाचा लोकांना योग्य मोबदला मिळतो की नाही याचा विचार करताना त्यात त्यांची गणना येत नाही. हायस्कूल ही प्रायमरी मुलींच्या शाळेची पुढची पायरी आहे व प्रायमरी मुलींच्या शाळांतून न मिळणारे शिक्षण देण्याकरीता हे फिमेल हायस्कूल आहे. हे ठिक आहे, परंतु या पुढचा मार्ग इतका सुगम नाही. आपल्याकडे मुलींची लग्ने ऋतू प्राप्त होण्यापूर्वीच करण्याची वहिवाट व शास्त्र असल्यामुळे, व एकदा मुलीचे लग्न झाले, म्हणजे सासरी तिला हळूहळू गृहकृत्यांकडे वळावे लागत असल्यामुळे, मुलींच्या शाळातून विवाहीत स्त्रियांची संख्या फारशी, किंबहुना मुळीच नसते असे म्हटले तरी चालेल व विवाह झाल्यानंतर शाळेचे दर्शन झाल्यामुळे तत्पूर्वी मुलीस जे काही थोडेबहुत ट-फ येत असते तेही ती विसरून जाते. सारांश, मुलींच्या शाळेपासून बायका शिक्षित असल्यापासून समाजास जो फायदा व्हावयाचा तो होत नाही हे अगदी उघड आहे. हीच उणीव दूर करण्याचा फिमेल हायस्कूलच्या उत्पादकांचा मुख्य उद्देश असावा असे आम्हांस वाटते व हाच जर त्यांचा उद्देश असेल, तर तो योजलेल्या उपायांनी कितपत सिध्दीस गेला हे पाहावयाचे असल्यास, या हायस्कूलमध्ये अशा त-हेच्या हिंदू विवाहीत स्त्रिया किती आहेत हेच आपण आधी पाहिले पाहिजे. एकंदरीत विवाहित स्त्रियांची संख्या २० धरली तर त्यापैकी इतर धर्मांच्या म्हणजे यहुदी वगैरे स्त्रिया वजा केल्या तर आपणांस या स्कूलपासून किती उपयोग होतो याची वाचकांस कल्पना येईल. टिळकांच्या मते, हे होण्याचे कारण म्हणजे या हायस्कूलच्या व्यवस्थापकांनी सद्यांच्या समाजस्थितीचा नीट विचार न करता दहा-पांच "काल्पनिक सुधारणा" एकदम करण्याच्या आतुरतेने या स्कूलची अशी स्थिती झाली आहे. तसेच हायस्कूलमधील शिक्षण प्रायमरी शिक्षणाचा जरी उत्तरभाग आहे, तरी या उत्तर शिक्षणाचा प्रायमरी शिक्षणाप्रमाणे स्त्रियांस सार्वत्रिक उपयोग होत नाही. ही गोष्ट या हायस्कूलच्या व्यवस्थापकांनी ध्यानात ठेवायला हवी होती. ती त्यांनी ठेवलेली नाही असे मला वाटते. [१०]

टिळकांच्या मते, मुलींनी जर सर्व गृहकृत्ये सोडून दररोज ११ ते ५ वाजेपर्यंत ख्रिश्चन मास्तरणीबरोबर पाश्चात्य विद्येची घोकंपट्टी करण्यात वयाची पहिली १५-१६ वर्षे घालविली तर त्याचा काही एक उपयोग होणार नाही व त्याला कोणी तयारही होणार नाही. फिमेल हायस्कूलमध्ये मध्यम स्थितीतील लोकांच्या विवाहित मुली फारशा नाहीत त्याचे हेच कारण आहे. एका इंग्रजाचे असे म्हणणे आहे की, धंदे शिक्षणात कारागिरीचा भाग प्रथम शिकवला पाहिजे. कारण मुले मोठी झाली म्हणजे मग त्यांचा कामावर हात चांगला बसत नाही. आमच्या स्त्रियांचीही गोष्ट काही अंशी या प्रमाणेच आहे. १५-१६ वर्षांपूर्वीच तिला गृहकृत्यांची चांगली माहिती पाहिजे व ती घरात जितकी मिळेल तितकी शाळेत कधीही मिळणार नाही. टिळकांच्या मते, स्त्री शिक्षणाचे सासर हे एक वर्कशॉप आहे. त्या वर्कशॉपमधून त्यांना न काढता उपयुक्त व स्वधर्मानुकूल उदार शिक्षण देण्याची जर कांही सोय असेल तर ती आम्हाला पाहिजे आहे. ही सोय होऊन जर कोणाला पाश्चात्य शिक्षण हवे असेल तर तीही सोय करण्यात येईल. परंतु पाश्चात्य शिक्षणासाठी उपयुक्त व स्वधर्मानुकूल उदार शिक्षणाचा त्याग करून काही उपयोग नाही. पहिली शिक्षणाची सोय प्रधान आहे व तीच आज आम्हाला मुख्यत्वे हवी आहे. या फिमेल हायस्कूलपासून कांहीतरी उपयोग होईल असे वाटत होते. परंतु ते स्कूल मध्यम प्रतीच्या लोकांना असून नसून सारखेच आहे. तात्पर्य प्रायमरी शिक्षण व मास्तरणीचा धंदा शिकवण्याच्या कामी फिमेल हायस्कूलचा उपयोग दिसत असल्यामुळे ते अनावश्यक आहे असे टिळकांचे मत होते. पुरुषांच्या सारखे स्वतंत्र धंदे काढण्यासाठी शिक्षण देण्याचा विचार तर कित्येक शतके टिळकांना अशक्य वाटत होता. त्यांच्या मते फार तर त्यापासून दहा-पांच श्रीमंत स्त्रियांस त्याचा फायदा होईल, त्यामुळे त्या कामी खर्च होणाऱ्या पैशाचा अपव्यय होत आहे व हल्लीचा शिक्षणक्रम आमच्या मध्यम स्थितीतील लोकांच्या चालीस, रीतीस व धर्मास अनुकूल नसल्यामुळे तो निरुपयोगी आहे.

या शिक्षणक्रमात जर काही फरक होणार नसेल तर इतके पैसे प्रतिवर्षी पाण्यात टाकल्याप्रमाणे होणार आहेत. टिळकांच्या मते, मुलींच्या शाळेत जे प्रायमरी शिक्षण मिळते त्यापेक्षा आमच्या स्त्रिया सुशिक्षित होण्यास जास्त शिक्षणाची आवश्यकता असून ते त्यांना ज्या ठिकाणी त्यांच्या इतर कृत्यांत आड न येता मिळेल असे एखादी इन्स्टिटयूशन आम्हांस आवश्य हवे आहे व या गोष्टींचा आम्ही वारंवार उल्लेख केला आहे. परंतु तो मनांत न आणता किंवा त्याकडे दुर्लक्ष करून फिमेल हायस्कूलची दिशा अत्यंत चुकीची आहे असे म्हणण्यांत आमचा गुप्त हेतू स्त्री शिक्षणाविरूद्ध आहे असे सांगणारे साहसी सुधारक आपल्या मेंदूचा कमजोरपणा व आपल्या अंत:करणाची दूषितता मात्र जगास व्यक्त करीत आहेत. टिळकांच्या मते, आमच्या राष्ट्रात मुलींचे विवाह ऋतूकालापूर्वी करण्याची जी रीत आहे ती चांगली असो वा वाईट असो, ती बदलण्यास बराच काळ गेला पाहिजे. ही गोष्ट निर्विवाद आहे. एकदा विवाह झाला म्हणजे अर्थातच त्या स्त्रीचे आयुष्य गृहिस्थ धर्मात जाणार हे ठरलेले आहे. डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या प्रमाणे एखादी स्त्री विवाहोत्तरही पती संमतीने व अन्य कारणांनी विद्याध्ययन करून पुरूषां प्रमाणे एखादा धंदा करू शकेल. परंतु आमच्याकडील विवाहपद्धती जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत अशी उदाहरणे क्वचीत दृष्टीला पडतील. तथापि त्यांचे महत्त्व लक्षात घेऊन अशा स्त्रियांना योग्य मदत मिळून त्यांचा मार्ग सुलभ केला पाहिजे. परंतु स्त्रिया सुशिक्षित झाल्यास त्यापासून आपले पाऊल पुढे पडण्यास बरीच मदत होईल. यात जर काही अर्थ असेल, तर तो अर्थ विरक्तव्यक्तीच्या हातून साध्य होणार नाही. स्त्रियांची सुधारणा करण्यासाठी ज्या स्त्रिया विवाहबद्द होऊन संसारात पडल्या आहेत त्यांनाच संसारातून न काढता सुशिक्षित केले पाहिजे व त्या सुशिक्षित झाल्या म्हणजे आपली सुधारणा व्हायला सहाय्य होणार आहे. "स्त्री सुधारणा" व "स्त्री शिक्षण" यांचा उद्घोष करणाऱ्यांनी ही गोष्ट आवश्य ध्यानात ठेवली पाहिजे की, जोपर्यंत विवाहित स्त्रियांच्या

समुदायास सुशिक्षित करण्याचा प्रयत्न चालू नाही तोपर्यंत ख-या स्त्री शिक्षणास आमच्याकडे सुरुवात झाली असे कधीही म्हणता येणार नाही. टिळकांच्या मते, प्रायमरी शिक्षणाच्या पुढील पायरी म्हणजे हायस्कूल-मधील शिक्षण होय. पण ते कोणाकरीता तर मुलांकरीता आहे. संसारात पडणा-या स्त्रियांस त्यापेक्षा निराळ्याच त-हेचे शिक्षण पाहिजे व ते ज्या स्कूलमध्ये मिळत नाही त्याचा स्त्री शिक्षणाच्या कामी कधीही उपयोग होणार नाही. परंतु फिमेल हायस्कूलच्या उत्पादकांस या गोष्टी न कळण्यासारख्या नाहीत. पण कशानेही म्हणा, त्यांची दृष्टी इकडे मुळीच जात नाही. फिमेल हायस्कूलमधील शिक्षणक्रम विवाहित स्त्रियांना सोयीवार नव्हताच व आमच्या येथील मुलांच्या शाळांतूनही अजून बोर्डिंगची व्यवस्था नीट नव्हती. तेथे या फिमेल हायस्कूलच्या उत्पादकांनी बोर्डिंगची सोय मुलीसाठी केली. टिळकांनी यावर असा युक्तीवाद केला की, फिमेल हायस्कूलचे उत्पादकहो, आपल्या चातुर्याची या कामी तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. मुलांच्या शाळांनाही आपण खाली पहायला लावलेत यांत अगदी शंका नाही. परंतु प्रश्न इतकाच की, या आपल्या बोर्डिंगमध्ये कोणत्या प्रतीच्या स्त्रिया आहेत किंवा येतील याचा तुम्ही नीट विचार केला आहे काय ? परगावच्या १४-१५ वर्षांच्या संभावित गृहस्थांच्या मुली आपल्या बोर्डिंगमध्ये किती आहेत याची माहिती आपण याल काय ? मुलांप्रमाणे मुलीनाही हायस्कूल झाले, बोर्डिंग राहिले होते,तेवढेही झाले, इतकेच जर आपले कर्तव्य तुम्ही समजत असाल तर त्यास आमचे काही म्हणणे नाही. बाकी विवाहित मुलींना मुलांप्रमाणे स्वतंत्र अभ्यास करण्यासाठी लोक आपल्या मुली या बोर्डिंगमध्ये पाठवतील ही गोष्ट आम्हांला तर आज संभवनीय दिसत नाही. मास्तरणीचा धंदा करुन उदरनिर्वाह करु इच्छिणा-या कांही गरीब व अनाथ स्त्रियांखेरीज या बोर्डिंगमध्ये कोण येणार ? ज्या प्रमाणे फिमेल हायस्कूल हे फक्त काही श्रीमंत व अनाथ

स्त्रियांच्याच उपयोगी आहे, त्याप्रमाणे ह्या बोर्डिंगचाही अनाथ स्त्रीगृहा-पेक्षा जास्त काही उपयोग होणार नाही असे आम्हाला वाटते." ११

लो. टिळकांच्या मते, ज्याप्रमाणे पं. रमाबाईंनी येथे येऊन एक विधवा गृहस्थापन केले त्याप्रमाणेच या बोर्डिंगचा काही अंशी उपयोग झाल्यास करावा असा त्यांचा हेतू असावा. एरवी आपल्या समाजाची ज्यास यत्‌-किंचित ओळख आहे त्यांच्या हातून समजून उमजून परगावचे लोक आपल्या विवाहित १४-१५ वर्षांच्या मुली या बोर्डिंगात विद्याभ्यासांकरिता पाठवतील असे मानण्याचे धारिष्टय झाले नसते. आमचे म्हणणे इतकेच आहे की, सध्याच्या समाजस्थितीचा विचार करतां पुण्यातील फिमेल हायस्कूल किंवा त्याच्या बोर्डिंगपासून आम्हांस काही फायदा नाही. ज्याप्रमाणे प्रार्थना समाजाने धर्म सुधारणा झाली नाही, त्याप्रमाणे या हायस्कूलमुळे स्त्री शिक्षणाच्या कामी काही व्हावयाचे नाही. टिळकांच्या मते, फिमेल हायस्कूलमधून जरी एखादी स्त्री एम्.डी. किंवा एम्.ए. झाली तरी त्यामुळे आमच्या समाजांतील एकंदर स्त्री समुहाची सुधारणा व्हावयाची नाही. आणि जर फिमेल हायस्कूलमधून एकंदर स्त्रीसमुहास संसारोपयोगी शिक्षण देण्याची व्यवस्था जर होणार नसेल तर ते असून नसून सारखेच आहे. फिमेल हायस्कूलवर प्रतिवर्षी जे हजारो रुपये खर्च होतात ते केवळ दहा-पांच लोकां-साठीच आहेत असा आमचा समज नाही व सरकारचाही असेल असे आम्हांस वाटत नाही व एवढयावरून आम्ही ज्या थोडया लोकांस या स्कूलचा फायदा मिळतो त्यांचा हेवा करतो असे कोणी समजू नये. साधारण लोकांची प्रथमत: सोय होऊन जर श्रीमंत लोकांची सोय होत असेल तर ती सरकारने खुशाल करावी, पण जर दोघांकडे पैसे नसतील तर आधी बहुजन समाज-सुधारणेकडे पैसे खर्च केले पाहिजेत. आमच्या सुधारक भक्तांप्रमाणे आम्ही आमचे विचार चुकले नसतील असे म्हणत नाही. तथापि आमच्या म्हणण्याची चूक न दाखवितां जर दुराग्रहाने, अभिमानाने व शहाणपणाच्या घमेंडीने

आमच्यावर दांभिकत्वाचा आरोप कोणी आणू पाहील, तर लोकांच्यापुढे त्यांच्या मेंदूचे वजन आम्हांला अवश्य करावे लागेल. [१२]

सारांश, स्त्रियांचे शिक्षण हे पुरुषांसारखे असू नये. कारण त्यांच्या गरजा वेगळ्या आहेत हा विचार १८८६ साली लो. टिळकांनी मांडला होता. तोच विचार प्रा. कर्वे यांच्या स्त्रियांच्या विद्यापीठाच्या कल्पनेसंबंधी लिहिताना १९१८ सालीही त्यांनी मांडला होता. टिळकांनी मुलींना मुलांप्रमाणे शिक्षण देण्याला विरोध केलेला दिसून येतो. तसेच विवाहीत स्त्रियांना गृहकृत्याचेच शिक्षण द्यावे असा त्यांचा आग्रह होता. स्त्रियांच्या उच्च शिक्षणाला विरोध करून त्यांनी प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार केलेला दिसून येईल. परंतु गो.ग. आगरकरांनी मात्र स्त्रियांच्या प्राथमिक शिक्षणाबरोबर उच्च शिक्षणाचा सुध्दा पुरस्कार केलेला दिसून येईल. आगरकरांच्या मते, सार्वजनिक शिक्षणाची आवश्यकता ही अगदी अलीकडील संकल्पना असल्यामुळे कोणत्याही जुन्या राष्ट्रांत स्त्रियांच्या शिक्षणाकडे लोकांचे लक्ष वेधलेले नाही यात काही नवल नाही. सिरिया, इराण, इजिप्त, हिंदुस्थान, चीन वगैरे देशात ज्ञानाचा बराच प्रसार झाला होता. पण ते ज्ञान त्या त्या लोकांतील एक किंवा अधिक वर्गाच्या हाती असे. त्या शिवाय बाकीचा सर्व वर्ग अडाणी रहात होता. गार्गीवाचक्नवी किंवा वडवा प्रतिथेयी अशा पूर्वकालीन स्त्रियांच्या नांवावरून किंवा रामायण महाभारत या पुराणांत अथवा कालीदास भवभूत्यदिकांच्या ग्रंथात स्त्री-शिक्षणाचा जो अप्रत्यक्ष उल्लेख झाला असेल त्यावरून भरतखंडात बायकांना शिक्षण देण्याचा परिपाठ होता असे म्हणणे म्हणजे झाशीच्या लक्ष्मी-बाईच्या उदाहरणावरून संपूर्ण हिंदुस्थानातील स्त्रिया लढाऊ आहेत किंवा अहिल्याबाईच्या उदाहरणावरून त्या राज्यकार्यकुशल आहेतअसे म्हणण्यासारखेच आहे. आगरकरांच्या मते पंडिता रमाबाईच्या वडिलांसारख्या काही असामान्य

पुरुषांनी आपल्या बायकोला, मुलींना, सुनांना किंवा बहिणींना त्या काळी उपलब्ध असलेली सारी विद्या दिली असेल, कित्येक राजघराण्यातील स्त्रियांना नर्तन, गायन, वादन कलांबरोबरच वाचन, लेखन, कला शिकवण्याची रूढी असेल. तसेच वेदांताविषयी मनाची विशेष प्रवृत्ती असल्यामुळे मुक्ताबाई-सारख्या काही भाविक स्त्रियांनी तत्त्वज्ञान संपादनाच्या अत्युत्कट इच्छेने कित्येक ग्रंथांचे वाचन केले असेल, पण तेवढयावरून मुलींना शाळेत पाठ-विण्याचा किंवा घरच्या घरी लिहिण्यावाचण्यास शिकविण्याचा प्रचार कोणत्याही वर्गात रूढ होता असे दाखविण्यास आमच्यापाशी पुरावा नाही. आगरकरांच्या मते सर्व देशातील सामान्य लोकांच्या स्त्रिया अशिक्षित असत, परंतु स्पार्टन लोकांत मात्र पुरुषांप्रमाणे स्त्रियांस हरएक प्रकारचे शिक्षण देण्याचा परिपाठ होता. त्यामुळे स्पार्टन कुटुंबात स्त्रियांचे जितके वजन असे व त्यांच्या सुशिक्षितपणाचा त्यांच्या संततीवर जितका परिणाम घडे, तितके वजन व तसा परिणाम दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रांत दिसून आला नाही. आपल्याप्रमाणेच अथेन्सचे लोक प्रसंगविशेषाशिवाय स्त्रियांस मोकळे-पणाने समाजांत वावरू देत नसत. स्पार्टन लोकांवर तेथील स्त्रीवर्गाचा फार मोठा प्रभाव होता. त्याबद्दल त्यांना टोचून बोलताना, "हे स्त्री राज्यांतले लोक" असे अथेनिअन्स म्हणत. रोमन लोकांत स्त्रियांना मोठा मान होता तसेच लहान मुलांप्रमाणे ते मुलींनाही शाळेत पाठवित. तथापि हा प्रचार सर्व वर्गातील रोमन लोकांत रूढ असेल किंवा नाही याची शंकाच आहे. ग्रीक व रोमन लोकांची राज्ये लयास गेल्यावर जी अलीकडील राज्यपद्धती प्रस्थापित झाली, तिचा मूळ पाया घालणारा राजा शार्लमेन याने मुलांप्रमाणेच मुलींच्या शिक्षणाबद्दलही पुष्कळ व्यवस्था केली होती. परंतु युरोपमध्ये धर्मक्रांती होईपर्यंत स्त्रीशिक्षणाकडे लोकांनी फार लक्ष दिले नाही. ल्यूथरने पुरुषांच्या प्रमाणेच स्त्रियांचाही शिक्षणाचा आग्रह धरलेला होता. त्यांच्या मते बायबलातील खरे रहस्य जसे पुरुषांना तसे स्त्रियाना कळल्याशिवाय खरी धर्म सुधारणा होणार नाही. युरोपियन धर्ममठांत ईश्वरभक्तीपरायण

ज्या स्त्रिया करतात, त्यांना नन्स म्हणतात. या नन्स स्वत: सुशिक्षित असून इतर स्त्रियांनाही शिक्षण देत असत. परंतु याद्वारे स्त्री शिक्षणाचा हवा तेवढा प्रसार होत नव्हता व तो कधीही झाला नाही. स्त्रियांचे शिक्षण पुरूषांच्या शिक्षणाच्या मागून किंवा फार झाले तर बरोबर येणारे आहे. आपल्या हाती सत्ता असून आपण अज्ञान राहणे आणि स्त्रियांना सज्ञान होऊ देणे इतकी परोपकारी बुध्दी पुरूषांच्यात नाही. एका बाजूस ज्ञानाचा मुळीच गंध नाही व दुस-या बाजूस पुरूषांप्रमाणे मोठ-मोठया विद्यालयांत शिकून हव्या त्या पदव्या संपादण्याची व पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणे करण्याची सदर परवानगी, अशी जी विलक्षण स्थिती पृथ्वीच्या पाठीवर दिसत आहे त्यावरून अनुमान केले तर, पुरूषांप्रमाणे स्त्रियांना ज्ञानमंदिराची द्वारे आम्हांस आज नाही तर उद्या खुली करून द्यावी लागणार हे लक्षात ठेवून श्री. सयाजीराव गायकवाड जर मुलांच्या शिक्षणां-प्रमाणेच मुलींच्या प्राथमिक शिक्षणाबद्दल ही सक्तीचा कायदा करतील तर उच्च कुळातल्या मराठयांनी आपल्या स्त्रियांस आजपर्यंत गोषात कोंडून जी अपकिर्ती संपादली आहे तिचे परिमार्जन होईल. समाजाच्या उन्नतीसाठी मुलींना उच्च शिक्षणाही मिळणे आवश्यक आहे असे आगरकरांनी प्रतिपादले आहे. पण त्यासाठी बालविवाहाची चाल बंद होऊन प्रौढविवाह सुरू होणे आवश्यक आहे. असे त्यांनी म्हटले आहे. कारण तेरा-चौदा वर्षापासूनच जर मुलींच्यामागे गरोदरपणा, बाळंतपण व अपत्य संगोपन इ. कामे लागली, तर त्यांना अभ्यास करणे अशक्य होते. म्हणून उच्च शिक्षण मिळवायचे असेल तर मुलींनी तोपर्यंत अविवाहीत राहिले पाहिजे. [१३]

गो.ग. आगरकरांच्या मते, स्त्री पुरूषांची योग्यता जर सारखी असेल तर स्त्री शिक्षणाचा सवता सुभा काय म्हणून निर्माण करायचा ? विशिष्टीकरण म्हणून मुलांइतकीच मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता आहे.

याबरोबरच स्त्रियांस वरिष्ठ प्रतीचे शिक्षण यावे किंवा नाही ? हा प्रश्न सुधारक व पुराणमतवादी यांच्यात सुरू होता. सुधारक आगरकरांच्या मते विद्या हे एक प्रकारचे धन आहे व इतर धनिकांप्रमाणे विद्यारूप धन ज्यांस प्राप्त झाले आहे त्यापैकी कित्येकांना ते दुस-यांस येऊ नये असे वाटते. ग्रीक लोकांनी शास्त्रे पढावी, ज्ञान संपादावे, ऐषआराम भोगावा व अंमल करावा आणि इतर लोकांनी ग्रीक लोकांचे गुलाम होऊन रहावे. कारण ग्रीक लोकांच्या बरोबरीने राहण्यास ते जात्याच असमर्थ आहेत. असा ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्वत्यांचे मत होते. गुलामांचा व्यापार बंद होईपर्यंत आफ्रिकेतील निग्रो लोकाविषयी अनेक ख्रिस्ती लोकांचेही असेच म्हणणे होते. इतकेच नव्हे तर राज्यविस्तार करण्याची महत्वाकांक्षा अद्यापि पूर्ण तृप्त झाली नाही, अशा कित्येक राष्ट्रास या घटकेस असे वाटत आहे की, कांही लोकांनी बादशाही मिरवावी आणि कांहींनी नेहमी त्यांचे पादांकित होऊन राहावे. हा नि:संशय सृष्टीनियम आहे. ब्राम्हणांनी विद्या संपादावी, क्षत्रियांनी राज्य करावे, वैश्यांनी व्यापार करावा आणि शूद्रांनी कनिष्ठ प्रतीची सेवा करावी ही आमची पूर्वीची व्यवस्था. तात्पर्य काय, संपत्ती, अधिकार व विद्या ही ज्यास प्राप्त होतात त्यास ती आपणाच बळकावून बसावे असे वाटू लागते व तसे करणे आपला हक्क आहे. तसे करण्यांतच आपले व दुस-याचे परमहित आहे अशीच व्यवस्था असावी असा परमेश्वराचा किंवा सृष्टीचा हाच हेतू होता किंवा आहे. असा तर्कवाद मोठमोठे विद्वान, धनिक व अधिकारी दिवसाढवळ्या बेलाशक करीत आले आहेत व आणखी अनेक शतके करतील. आगरकरांच्या मते जेव्हा दोन पक्ष पडतात तेव्हा त्यांच्याच कंपूतून काही इसम फितुर होऊन उलट पक्षांस मिळतात आणि त्यांच्यावतीने पूर्वीच्या आपल्या जातभाईशी भांडू लागतात. बहुजन समाजाचे पाऊल जे हळूहळू पुढे पडत चालले आहे हे या रीतीने पडत चालले आहे. आजपर्यंत पुरूषा पुरूषांचा

संग्राम सुरू होता. परंतु येथून पुढे तो स्त्री पुरूषांत होणार आहे. किंबहुना कित्येक देशात तो सुरू झाला आहे. परंतु अशा प्रकारचा संघर्ष आपल्याकडे सुरू व्हायला बराच कालावधी , . . रीच . . लागणार आहेत. इतर जी सुधारीत राष्ट्रे आहेत त्यांना एवढे तरी वाटू लागले आहे की, झाडून सा-या स्त्रियांना व पुरूषांना व मुलांना आणि मुलींना प्राथमिक शिक्षण मिळालेले असावे, अगर मिळावे. आमच्या येथे मात्र ही प्रक्रिया सुरू झालेली नाही. ब्राह्मणेतर प्रत्येक जातीच्या मनुष्यास थोडेबहुत शिक्षण मिळाले तर हिंदुस्थानवर दुर्धर प्रसंग उद्‌भवणार नाही अशी आमच्या कित्येक शहाण्या म्हणविणा-या पुढा-यांची व लोकमत लोकांपुढे व सरकारपुढे आणण्याचा आणि त्यास योग्य वळण लावणा-या पत्रकर्त्यांची खात्री झाली पाहिजे. ती होण्यास निदान अनेक वर्षे तरी लोटली पाहिजेत आणि ती झाल्यावर नंतर स्त्री शिक्षणाचा विचार होईल किंवा सुदैवाने मुलांच्या शिक्षणाबरोबर मुलींच्या शिक्षणां-विषयी ही चर्चा सुरू झाली तर मुलांप्रमाणेच सा-या मुलींनाही प्राथमिक शिक्षणाची आवश्यक्ता आहे. अशी या लोकमतप्रचारकांची किंवा स्वनियुक्त लोकप्रतिनिधींची खात्री होण्यास किती वेळ लागेल हे सांगू शक्त नाही. बहुधा सर्व मुलींना प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे, हे विधान त्यांच्या पसंतीस संपूर्णतः कधीही उतरणार नाही, पण लोकलाजेस्तव ते त्या विधानाला आपला बाह्य पाठिंबा दाखवू लागले तरी मुलीस मुलींप्रमाणे मध्यम किंवा वरिष्ठ शिक्षण द्यावे किंवा नाही असा प्रश्न निघेल तेंव्हा ते त्याचा निषेध करण्या-साठी बुध्दीसामर्थ्याची, लेखन कुशलतेची, वाक्यपांडित्याची पराकाष्ठा करतील. परंतु या गोष्टीतही सुधारकांचा विजय होऊन या हताश, विचारशून्य, मत्सरी, भेकड, मुर्ख अथवा आपमतलबी लोकांना आपली डोकी गुडघ्यात घालण्याची वेळ येईल. [१४] तात्पर्य आगरकरांनी स्त्री शिक्षणाच्या सक्ता सुध्याला विरोध केलेला दिसून येतो. तसेच मुलींना जर उच्च शिक्षण द्यावयाचे असेल तर मुलींना तोपर्यंत अविवाहीत ठेवले पाहिजे असे मत व्यक्त केले. टिळकांनी

मात्र या गोष्टीला विरोध केलेला आहे. तसेच आगरकरांनी स्त्री पुरुषांना एकत्र व एकाच प्रकारच्या शिक्षणाचा पुरस्कार केलेला दिसून येतो.

गो.ग. आगरकरांच्या मते प्रत्येक मुलास व मुलीस आई-बापांनी किंवा बापाने प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे, असे अलीकडे लोकमत सर्वत्र झाले आहे. त्याप्रमाणेच स्त्रियांनी व पुरुषांनी पाहिजे तो छंद स्वतंत्रपणे करणे, पाहिजे ती विद्या मिळवणे, पाहिजे त्या परीक्षा व पदव्या मिळवणे आणि पाहिजे तेव्हा लग्ने करून हवा तसा संसार करणे अशी परिस्थिती निर्माण होईल असा आगरकरांना विश्वास वाटत होता. १९ व्या शतकात हिंदू स्त्रियांना वरिष्ठ शिक्षण असावे की नसावे हा वाद त्यावेळी सुधारक व पुराणमतवादी यांच्यात सुरू होता. यावर आगरकर असा युक्तीवाद करतात की, मध्यम प्रतीचे किंवा वरिष्ठ प्रतीचे शिक्षण स्त्रियांना देण्याचा प्रघात पडण्यापूर्वी, आमच्या विवाहकालात व विवाहपध्दतीत बराच फरक होणे आवश्यक आहे. लग्न झाल्यानंतर मुले हायस्कूलमध्ये किंवा कॉलेजमध्ये जाऊन माध्यमीकिंवा वरिष्ठ शिक्षण संपादन करीत असतात. परंतु मुलींना अशा प्रकारे शिक्षण संपादता येत नाही. बायकोला नहाण आलेले असो किंवा बायको गरोदर असो किंवा तिला मुल झालेले असो, मुलांचे लक्ष विद्येकडे असेल तर त्याची ही विलक्षण गृहस्थिती त्याच्या मार्गात फारशी येत नाही. अल्पवयांत प्राप्त झालेली गृहस्थती किंवा पितृता विद्यार्जनास केवळ विघातक होत नाही, असा पुष्कळांचा अनुभव आहे. पण जर तेराव्या किंवा चौदाव्या वर्षापासून मुलींच्या पाठीमागे गरोदरपणा, बाळंतपणा, अपत्यसंगोपनाचीही लचांडे लागली तर ती हायस्कूल किंवा कॉलेजमध्ये जाऊन शिक्षण संपादन करू शकणार नाही किंवा मॅट्रिक्युलेशन, बी.ए., एम्.एस्, ॲन्ड एस्. एल्.सी.ई. अथवा एल्.एल्.बी. सारख्या पदव्या ती संपादन करू शकणार नाही. मुलींकडून जर असल्या परीक्षांचा अभ्यास व्हावयाचा असेल

तर त्या अविवाहित राहिल्या पाहिजेत, किंवा विवाहित असून त्यांना अविवाहितासारखे त्यांच्या नव-यांनी व सासु-सास-यांनी राहू दिले पाहिजे. पण या पिढीमध्ये हे शक्य दिसत नाही. रजोदर्शनापूर्वी सा-या मुलींची लग्ने झालीच पाहिजेत व रजोदर्शन झाल्याबरोबर गर्भाधानविधी उरकलाच पाहिजे, तसे झाले नाहीतर मुलीकडील चाळीस पिढयांस दुर्गती प्राप्त होते, अशा प्रकारच्या अधर्मी धर्मापुढे लोटांगण घालणारे किंवा त्यापासून काही त्रास झाला तर कोणत्याही परिस्थितीत त्या त्रासालाच सुख मानणारे वेडे पीर जोपर्यंत नाहीसे होत नाहीत तोपर्यंत मुलींना मुलांप्रमाणे मध्यम किंवा वरिष्ठ शिक्षण संपादन करता येणार नाही. आगरकरांच्या मते मुलींचे लग्न झाले की ती आईबापाचे घर सोडून नव-याच्या संसाराचे अधिपत्य स्वीकारते. या दरम्यान तिला सासुसास-यांच्या हाताखाली उमेदवारी करावे लागते. आणि त्यामुळे तिला शिक्षण घेण्यात अनेक अडचणी निर्माण होतात. म्हणून आई-बापांनी प्रथम मुलांच्या विद्येकडे व सुखांकडे लक्ष द्यावे, व त्यांना लौकर आई-बाप करून त्यांच्या पोरांची जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन सगळ्यांनाच हालात पाडण्याचा आग्रह धरू नये. हिंदुस्थानातील दूष्य व निंद्य वैवाहिक संस्थेमुळे आणि आचारामुळे हवी तशी व पुष्ट फलनिष्पती होत नाही. मुली व जावई यांचे अल्पवयांत सुखसोहळ पाहण्याची आमच्याकडे जी दुष्ट अभिरुची किंवा खोड लागली आहे त्यामुळे आपल्या मुलांमुलींचे आणि त्याबरोबरच सा-या राष्ट्राचे अतोनात नुकसान होत आहे. हे आमच्या लक्षात येत नाही ही मोठया दु:खाची गोष्ट आहे. ही दुष्ट अभिरुची गेल्याशिवाय या देशात अनेक मोठया स्त्रिया व पुरुष निर्माण होण्याचा संभव नाही. आणि अशा स्त्री-पुरुषांशिवाय कोणत्याही देशास चिरस्थायी मोठेपणा येणार नाही. तेव्हा स्त्रियांना वरिष्ठ प्रतीचे शिक्षण द्यावे किंवा नाही या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी आम्ही त्या मुलामुलींचा विवाहकाल वाढविण्यास तयार होणार किंवा नाही

याचे उत्तर देण्यास तयार झाले पाहिजे. [१५] म्हणजेच आगरकरांनी संमतीवय वाढविण्याचा पुरस्कार केलेला दिसून येतो. मुलीचे लग्न उशीरा केल्याशिवाय तिचे शिक्षण पूर्ण होणार नाही असा आगरकरांचा ठाम विश्वास होतो.

स्त्री पुरुषांना एकच शिक्षण यावे, व ते ही एकत्र यावे असे आगरकरांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या मते, स्त्री-पुरुषांना जर एकत्र शिक्षण दिले तर पुरुषांना घरी बसून मुले खेळविण्याचे, कपडे धुण्याचे, भांडी घासण्याचे, स्वयंपाक करण्याचे व दळणकांडप करण्याचे काम करावे लागते. त्याला आम्ही काय करणार ? असली कामे फक्त स्त्रियांनीच करावीत हा काही ईश्वरी नियम नाही. तसेच मुले जी होतात ती स्त्रियांनाच होतात म्हणून त्यांनीच ती कामे केली पाहिजेत असे कोणालाही सिध्द करता येत नाही. तसेच त्यांना जी मुले होतात ती त्याच्या इच्छेनुसारच होतात असे मला वाटत नाही. या संबंधी पुरुषांकडून स्त्रियांवर एकप्रकारे जुलूमच केला जातो. परंतु जसजसा पुरुषांच्यात विद्येचा अधिकाधिक प्रसार होत जाईल तसा स्त्रियांतही तो होणार आहे. तो वाढत गेला म्हणजे स्त्रियांना आपले खरे हित कशात आहे आणि ते साधावे कसे हे समजू लागेल. पुरुषांना आपला जुलूम पूर्णपणे सोडून यावा लागेल. विवाहाच्या वेळी स्त्री-पुरुषांची संमती जितकी आवश्यक आहे तितकीच संमती विवाहाच्या अंमलातही दृष्टीस पडली पाहिजे आणि तसे झाले तर स्त्रियांची पुष्कळ विपत्ती टळेल. सारे घडून येण्याला एकच उपाय आहे तो हा की, सध्या ज्या प्रकारचे शिक्षण पुरुषांना मिळत आहे त्याच प्रकारचे शिक्षण स्त्रियांना मुबलक मिळाले पाहिजे. स्त्रियांना शिक्षण देण्याचा विचार निघाल्यापासून कित्येक देशात त्यांस कोणत्या प्रकारचे शिक्षण यावे याबाबत चर्चा सुरु आहे. लिहिणे-वाचणे व हिशेब

करणे या तीन गोष्टी सा-या मुलींना शिकवण्यास कांही हरकत नाही असे सामान्य मत आहे. पण येथून मतभेद निर्माण होतो व वरिष्ठ शिक्षणाच्या संबंधाने त्याचा कळस होतो. प्राथमिक शिक्षण संपले म्हणजे मुलींना घरी ठेवून घेऊन प्रपंचव्यवस्था शिकवावी असे कित्येकांचे मत आहे आणि ज्यांना असे करायचे नाही किंवा ज्यांचा शाळेत पाठविण्याचा आग्रहच आहे तेथे शिवणकाम, गायन, पाकसिध्दी, गृहव्यवस्था, रेशमांची, लोकरीची वस्त्रे विणण्याचे काम, वेत, गवत वगैरे तत्वात्मक द्रव्यांनी होणारी करंडया वगैरे नक्षीची व साधी कामे, लहान मुलांचे संगोपन व रोगचिकित्सा, स्त्रियांचे रोग व त्यांवर औषधोपचार इत्यादी विषय ज्या शाळेत शिकवतात अशांतच त्यांना पाठवाव्यात, भूगोल, इतिहास, गणित, पदार्थविज्ञान, ज्योतिष वगैरे मेंदु खराब करणारे विषय त्यांच्यापुढे कधीही आणू नयेत त्यांत त्यांचा व जगाचा मुळीच फायदा नाही. कोणतेही शिक्षण देतांना ज्याला ते द्यावयाचे त्याची मानसिक व शारीरिक शक्ती मुळात कशी आहे याचा विचार केला पाहिजे. इतकेच नव्हे तर त्या व्यक्तीस आपले आयुष्य कोणत्या स्थितीत घालवावे लागणार आहे याचाही विचार केला पाहिजे. पुरुषांच्या विचारशक्तीपेक्षा स्त्रियांची विचारशक्ती स्वाभाविकपणे कमकुवत आहे व मुले होण्याचे आणि त्यांना वाढविण्याचे काम विधात्याने त्यांच्याकडेच दिले आहे. त्यामुळे त्यांना पुरुषांशी स्पर्धा करू न देता त्यांच्या नैसर्गिक आणि बुध्दीमत्तेस व त्यांच्या वाटयास आलेल्या स्वाभाविक कामास, योग्य असेच शिक्षण त्यास दिले पाहिजे. स्त्रियांनी विद्या शिकून बाहेरची कामे करावी आणि पुरुषांनी अक्षरशून्य राहून घरची कामे करावीत अशा मुळे दोघांचेही नुकसान आहे. पुरुषांच्या सुदृढ हातांनी व पायांनी बाहेरचे धक्के बुक्के खावे, उन्हाचा, थंडीचा व वा-याचा त्रास सोसावा, तात्पर्य, बायकांचा, मुलांच्या व आपल्या चरितार्थाकरिता लागतील तितके मानसिक व शारीरिक कष्ट करून द्रव्य

संपादावे हे जसे त्यांना उचित आहे, त्याप्रमाणेच कोमलांगी स्त्रियांनी घरी राहून पुरुषांनी कमावून आणलेल्या जिनसांची व्यवस्था लावावी. थकल्या भागलेल्या पतीला चांगले जेवण करुन घालावे. त्याची सेवा करावी. मुलाबाळांची खस्त खाऊन त्यांस चांगल्यारीतीने वाढवावे. यातच स्त्रियांचे खरे हित व सुख आहे. म्हणजे सध्या जी रुढी आहे ती उत्तम आहे, त्यात फेरफार करणे इष्ट नाही असे अनेकांचे मत आहे. या मताला अनेक डॉक्टरांची संमती असल्यामुळे कित्येकांच्या समजुतीने त्यास वेदवाक्याची प्रमाणता प्राप्त झाली. परंतु असला आग्रह उपयोगी नाही. पाहिजे त्या पुरुषाने पाहिजे ती विद्या संपादावी या मतास तरी सर्वांची अनुकूलता कोठे आहे व जी आहे ती तरी त्यास एकाएकी थोडीच मिळाली आहे. स्त्रियांना प्राथमिक शिक्षण देण्यास हरकत नाही यासाठीही खूप प्रयत्न करावे लागले आहेत. सत्ता वापरण्याची अक्कल अंगी असो वा नसो, ज्यास ती प्राप्त झाली आहे, त्यास ती सोडू नये, असे वाटते. अनेक कारणांमुळे स्त्रियांवर पुरुषांचे वर्चस्व स्थापण्यात आले आहे व त्यांना त्याची गोडी समजून चुकली आहे. तेव्हा त्यांना ते आपल्या हातून जाऊ नये असे वाटणे हे अगदी स्वाभाविक आहे. स्त्रियांच्या संबंधाने पुरुषांस पॅट्रिशिअन्स आणि पुरुषांच्या संबंधाने स्त्रियांस प्लिबिअन्स म्हणण्यास कांही हरकत नाही. पण ज्याप्रमाणे जुन्या रोमन लोकांतील हा विलक्षण स्वामीसेवक संबंध हळूहळू लयास गेला, त्याप्रमाणेच स्त्री-पुरुषांतील सेवकसंबंध कालांतराने नाहीसा होईल. सध्या पुरुषांना जी कामे करावी लागतात ती रोमन पॅट्रिशिअन्स म्हणजे उच्च कुलांतील लोक करीत असत, व सध्या स्त्रियांना जी कामे करावी लागतात ती प्लिबिअन्स म्हणजे तिथला दासवर्ग करीत असे. रोमन लोकांची प्राथमिक स्थिती जाऊन ते जसजसे उन्नतावस्थेत जाऊ लागले तसा हा स्वामीविवेक संबंध कमी होत जाऊन अखेरीस बुद्धीने, अनुभवाने, कर्तबगारीने जे श्रेष्ठ ठरले त्यांस संस्थानातील अधिकार त्यांच्या योग्यतेप्रमाणे मिळू लागले आणि प्लिबिअन्स व पॅट्रिशिअन्स

हा भेद शेवटी नाहीसा झाला. आगरकरांच्या मते, पुरुषांच्या मेंदूपेक्षा स्त्रियांचा मेंदू सरासरीने कमी वजनाचा आहे आणि स्त्री-पुरुषांमधील कामाची वाटणी त्यांच्या वजनावर अवलंबून असावी हे योग्य आहे असे जरी मानले, तरी सार्‍या पुरुषांचे मेंदू सार्‍या स्त्रियांच्या मेंदूपेक्षा अधिक जड आहेत, असे प्रतिपादण्याचे धारिष्टय अत्यंत अधिकार लोलूप पुरुषास देखील करता येणार नाही. अनेक स्त्रियांचे मेंदू अनेक पुरुषांच्या मेंदूहून जड भरतील यात संशय नाही. तेंव्हा मेंदूच्या मुद्यावरच स्त्रियांनी अमूक कामे करावी, असा निर्बंध करणे शुध्द अन्याय व क्रूरपणा आहे. ज्याला जे काम साधेल त्याने ते करावे अशी प्रत्येकास मोकळीक देण्यात ते करणाराच किंवा करणारणीचा आणि जगाचा फायदा आहे. सध्या पुष्कळ स्त्रियांच्या बुध्दिमत्तेची विनाकारण नासाडी होत आहेत. ज्या कामाला जे पुरुष बुध्दिसामर्थ्याने योग्य नाहीत त्यांच्याकडून ती कामे होत असल्यामुळे व स्त्रियांना ती करण्याची परवानगी नसल्यामुळे एकंदरीत जी कामे व्हावीत तशी ती होत नाहीत. प्रत्येक शास्त्रांत, कलेत व धंद्यात स्त्री-पुरुषांची चढाओढ लागून ज्याच्या त्याच्या व जिच्या तिच्या योग्यतेनुसार व्यवस्था लागली पाहिजे. शास्त्राभ्यास किंवा कलाभ्यास करण्यात स्त्रिया असमर्थ असतील तर त्या तशा ठरतील. पण अनुभवाने तसे ठरेपर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध करणे हा शुध्द दांडगेपणा आहे. अमेरिकेत मुलांप्रमाणे मुलींना वरिष्ठ शिक्षण देण्याचा उपक्रम सुरु केल्यापासून जे परिणाम घडून आले आहेत, त्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येईल की, जी शास्त्रे व कला केवळ पुरुषासच सुसाध्य आहेत, असे आपल्याला वाटत होते, ती शास्त्रे व त्या कला स्त्रियांनाही तितक्याच सुसाध्य आहेत व शास्त्र कलांच्या अभ्यासामुळे स्त्रियांचेही नैसर्गिक चारुत्व कमी होऊन अपत्य संगोपनाचे काम त्यांच्याकडून व्यवस्थित होईल. अमुक कामे स्त्रियांनी करावीत आणि अमुक कामे पुरुषांनी करावीत, असा आपल्या बुध्दीत जो आग्रह आहे याचे

प्रमुख कारण म्हणजे वाटणी करण्याचे काम पुरुषांच्या हाती आहे. ती स्त्रियांच्या हाती असती तर त्यांनीही अशीच एकदेशीय वाटणी करून आपल्याकडे उच्च कामे आणि पुरुषाकडे हलकी कामे ठेवली असती. कोणत्याही विद्वान व विचारी स्त्रीचे मत घ्या, ती कधीही असे म्हणणार नाही की, स्त्री-पुरुषांना एकच शिक्षण देण्यात स्त्रियांचे नुकसान आहे. स्त्री-पुरुषांत चालत आलेला हा वाद नाहीसा करण्याचा एकच उपाय म्हणजे मुलांना व मुलींना हव्या त्या शाळेत जाऊन हवे ते ज्ञान पाहिजे तितके संपादू द्यावे. [१६]

गो.ग. आगरकरांच्या मते आम्ही आपल्या भाषणांत स्त्रियांना अर्धांगी म्हणतो व धर्म, अर्थ, काम वगैरे गोष्टीत त्यांस सहचारिणीत्व देतो. पण ही दोन अर्धांगे बहुधा पोकळ धर्मज्ञापलीकडे कधीही जात नाहीत. स्त्रियांनी घराबाहेरच्या पंचायतीत पडणे योग्य नाही. हे जे विलक्षण मत आपल्या लोकांच्या मनात हजारो वर्षे खिळून राहिले आहे, त्यामुळे व आणखी काही कारणांमुळे, स्त्री-पुरुषांचा मिश्र समाज आपल्याकडे अगदी नापसंत वाटतो. स्त्री-पुरुषांना जर मोकळेपणी एकत्र वागू दिलेतर समाजावर मोठा दुर्धर प्रसंग येईल असा आपल्याकडे पक्का ग्रह होऊन गेला आहे. परंतु युरोपात असा परिणाम घडत नाही ही गोष्ट प्रत्यक्ष आमच्या पुढे असून आम्ही इतके घाबरून जातो, हे तरी आमच्या अविचाराचे द्योतकच आहे. पण एक गोष्ट आपण लक्षात घेण्यासारखी आहे की, ज्या युरोपखंडात कोणताही ठळक सामाजिक समारंभ किंवा विधी स्त्रियांच्या सानिध्यावाचून होत नाही त्या युरोपखंडातही स्त्री-पुरुषांना एकत्र शिक्षण द्यावे किंवा नाही या विषयी मोठा मतभेद आहे. घोडयाच्या शर्यती, चेंडूफळीचे खेळ, बक्षिसे वाटणे, इमारती उद्घाटन, व्याख्याने देणे, लग्नसमारंभ, प्रेतसंस्कार, मोठमोठया मेजवान्या, प्रदर्शने, नाना प्रकारच्या पार्ट्या व नाच या व अशाच अनेक समारंभास व विधिस स्त्रिया न येतील तर त्या लोकांत हे समारंभ व

व विधि मुळीच नकोसे वाटतील. युरोपीय समाजास जी एक प्रकारची उल्हासवृत्ती प्राप्त झाली आहे, ती त्यांच्या मिश्रणामुळे प्राप्त झाली आहे. असे म्हणण्यास हरकत नाही. ज्यांना मिश्र समाजाचा अनुभव नाही त्यांनीच असे मत प्रगट केले आहे. स्त्री-पुरुषांचे पाऊल वाकडे न पडणे यात समाजाचे मोठे हित आहे हे मला कबुल आहे. पण ते हित साधण्यासाठी बायकांना मागच्या दारी कोंडून घालण्याची आवश्यकता आहे, किंवा तसे केल्याने नितीचे रक्षण होते हे मला पटत नाही. ज्या समाजात स्त्रियांना जनान्यांत, पडद्यांत किंवा गोषात कोंडून ठेवण्याची पध्दत आहे, त्यांतच युरोपियन लोकांपेक्षा कमी नितिमत्ता असण्याचा संभव आहे. वारंवार, सर्वत्र ठिकाणी स्त्री-पुरुष एकमेकांना भेटू लागले तर विषयवासनेचा विचार त्यांच्या मनात फार क्वचीत येण्याचा संभव आहे. चैत्रमासी हळदीकुंकवास जाणा-या येणा-या बायका, पायघड्यास निघालेल्या बायका, स्टेशनवर तसेच गाडयातून जाणा-या बायका, किंवा शाळेत येणा-या मोठया मुली यांच्याकडे सभ्य म्हणविणारे निर्लज्ज लोक वाकडया नजरेने सरळ टक लावून बघतात, याचे कारण म्हणजे, इतर लोकांप्रमाणे आम्हा हिंदू लोकांना घडोघडी स्त्रियांचा सहवास घडत नाही आणि तसे झाले तर आमच्या असभ्य पणाच्या खोडी जाऊन आमच्या भाषणांत आणि वर्तनात आतापेक्षा पुष्कळ सभ्यपणा येईल. आगरकरांच्या मते शेकडा नव्वद हिंदूच्या निदान महाराष्ट्रीयांच्या सामान्य भाषणांत देखील बरीच अश्लिलता असते. आपल्या समाजात जर स्त्री-पुरुषांच्या गाठी वारंवार पडू लागल्या तर ही अश्लिलता नाहीशी होईल. ज्याप्रमाणे वाढणा-या शरीराला वळण लावणे कठीण होत नाही, परंतु एकदा त्याची वाढ खुंटली की त्याच्या अंगी ताठपणा येतो व वळण लावण्याची आशा खुंटते. त्याचप्रमाणे समाजाचीही स्थिती असते. मुसलमान लोकांप्रमाणेच कित्येक लोकांना स्त्रियांना पुरुष दर्शन देखील होण्याची भिती वाटत असते. अमेरिका व युरोपमध्ये स्त्री

पुरुषांना एकत्र शिक्षण दिले असतां त्याचा चांगला परिणाम घडेलच अशी खात्री नव्हती. पण अलिकडील प्रत्यक्ष अनुभवावरून त्यांची खात्री पटली आहे. ज्या खेडयामध्ये मुलांकरिता व मुलींकरिता दोन दोन स्वतंत्र शाळेची सोय नाही, त्या खेडयातील लोक लहान मुलींना व मुलांना एकाच शाळेत धाडण्याबद्दल युरोप व अमेरिकेत फारशी हरकत घेत नाहीत, आठ दहा वर्षांची मुले एकत्र वागू देण्यास कोणाच्याही मनांत विशेष शंका येत नाही. व ती येण्याचे कारण ही नाही. पण त्यातही पुराणमतवाद्यांना कित्येक दोष आढळतात. त्यांच्या मते, ज्याअर्थी स्त्री-पुरुषांचा आयुष्यक्रम अगदी निराळा आहे, त्याअर्थी त्यांना भिन्न शिक्षण भिन्न स्थळीच पहिल्या-पासून दिले पाहिजे. ही प्राथमिक शिक्षणाबद्दलची मते झाली. मध्यम व वरिष्ठ शिक्षण संपादणाऱ्या विद्यार्थिनी व विद्यार्थी एका ठिकाणी असूच नयेत, हे मत युरोप खंडातील बहुतेक देशात व युनायटेड स्टेटस्च्या कांही भागात कायम आहे. परंतु आगरकरांच्या मते, या मतांची रचना अनुभवावर न करता तर्कावर लोक करतात असे वाटते. तरुण स्त्रिया व तरुण पुरुष यांना एका वर्गात बसवून त्यांना एकाच शिक्षकाकडून व्याख्याने देण्याचा अनुभव प्रथम अमेरिकेत घेतला व तो अपेक्षेपेक्षा जास्त सफल झाल्याचे दिसून आले. एकत्र शिक्षणाला विरोध करणारे बहुधा पुढील तीन मुद्यांवर टिका करतात -

१) स्त्री-पुरुषामध्ये नैसर्गिक भेद मोठा आहे. तेव्हा त्यांना एकत्र शिक्षण दिल्याने त्या भेदानुरूप त्या शिक्षणांत जो फरक करणे जरूर आहे तो कधीही करता येणार नाही.

२) मुलांच्या द्वांडग्या वर्तनाचा मुलींच्या मर्यादशील वर्तनावर दुष्परिणाम होईल तसेच मुलींच्या सहवासाने मुलांना कांहीही फायदा होत नाही.

३) अल्पवयात जर मुले व मुली वारंवार एकत्र येऊ लागले तर त्यांच्या विषयवासना लौकर जागृत होऊन त्याचे दु:खकारक परिणाम त्यांच्या वर्तनात घडून त्याचा दुष्परिणाम होईल.

वयात आलेल्या मुली व मुले एकाच वर्गात बसत असतील व जर त्या वर्गाची व्यवस्था नीट ठेवण्यात येत नसेल तर वरच्यासारखे परिणाम क्वचित प्रसंगी घडून येण्याचा संभव आहे. पण उत्तम व्यवस्था असली की फारच चांगले परिणाम घडून येतात. असे अनुभवावरुन सिध्द झाले आहे. जे या पध्दतीचे समर्थन करतात त्यांनी एकत्र शिक्षणाचे पुढील फायदे सांगितले आहेत - १) मुलांना व मुलींना एका ठिकाणी शिकवल्याने मुलांना धाक लावणे फार सोपे जाते. मुलांचा हट्टीपणा, उध्दटपणा व दांडगे-पणा मुलींच्या सानिध्यामुळे कमी होतो. २) मुले आणि मुली यांना एके ठिकाणी शिक्षण द्यायचे असेल तर उभयंताना समजेल अशा शिक्षणपध्दतीचा अंगीकार करणे आवश्यक आहे. तसेच मुले आणि मुली नेहमी एकत्र वागल्याने त्यांच्या विषय वासनेवर अपायकारक परिणाम न घडता उलट त्या शांत व गंभीर होतील आणि त्यांचा मैत्रीचा पाया कोणत्याही बाह्यांगावर न घालता अंतरंगाची चांगली परिक्षा करून त्यावर तो घालण्याकडे त्यांचा कल होईल. [१७]

शारीरिक, मानसिक, भावनिक व बौध्दिक दृष्टया उद्याचे राष्ट्र आणि आजची प्रजा सकस राखण्याची जबाबदारी स्वीकारण्यास आणि आजचे राष्ट्र तेजस्वी राखण्यास म्हणजेच मातृपदाची व पत्नीपदाची जाणिवेने जबाबदारी पत्करण्यास स्त्रिया योग्य व्हाव्या म्हणून त्यांना सुसंस्कृत करण्यासाठी उभय जातीत ज्ञानाचा प्रसार केला पाहिजे असे आगरकरांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या काळी बाहुला-बाहुली सारखी लग्ने होत असल्याने

स्त्रीस चरितार्थ साधनाचे शिक्षण मिळावे असा आगरकरांचा आग्रह होता. आपल्या कुवतीप्रमाणे उत्कृष्ट साधेल तो उद्योगधंदा स्वतंत्रपणे करावयाचा नसला तरी, तो वेळप्रसंगी करावयाची वेळ, आल्यास हाती असावा म्हणून त्याचे शिक्षण प्रत्येक स्त्रीला मिळालेले असणे जरूरीचे आहे. वैधव्या-सारख्या किंवा घटस्फोटासारख्या विपत्तीच्या वेळी, तर आर्थिक स्वावलंब-नाच्या दृष्टीने अशा चरितार्थ साधनाची जरूरी फारच असते. म्हणून स्त्रीयांना शिक्षण दिले पाहिजे असे त्यांचे मत होते. स्त्री व पुरूषांना समान शिक्षण व एकत्र शिक्षण द्यावे असा आग्रह आगरकरांचा होता. तर स्त्री पुरूषांना अशा प्रकारे शिक्षण देऊ नये असे मत टिळकांचे होते.

......

## प्रकरण तिसरे

## स्त्रीशिक्षण


१) केळकर, भा.कृ., टिळक विचार, पृ.क्र. २६६.

२) केसरी, १३ जुलै, १८८७.

३) केसरी, २७ सप्टेंबर, १८८७.

४) गोखले, पुं.पा., आगरकरांशी ओळख, पृ.क्र. २४४.
प्रधान, ग.प्र., आगरकर लेखसंग्रह, पृ.क्र. १७६ – १७७.
सहस्त्रबुध्दे, पु.ग., केसरीची त्रिमूर्ती, पृ.क्र. १७४.

५) गोखले, पु.पा., आगरकरांशी ओळख, पृ.क्र. २४२.

६) केसरी, २७ सप्टेंबर, १८८७.

७) केसरी, ४ ऑगस्ट, १८८७.

८) कित्ता,

९) कित्ता,

१०) केसरी, ११ ऑगस्ट, १८८७.

११) केसरी, २५ ऑगस्ट, १८८७.

१२) कित्ता,

१३) सहस्त्रबुध्दे, पु.ग., केसरीची त्रिमूर्ती, पृ.क्र. १७५–१७६.
प्रधान, ग.प्र., आगरकर लेखसंग्रह, पृ.क्र. १७७–१७९.

१४) प्रधान, ग.प्र., आगरकर लेखसंग्रह, पृ.क्र. १८०–१८१
गोखले, पुं.पा., आगरकरांशी ओळख, पृ.क्र. २४९.

१५) गोखले, पुं.पा., आगरकरांशी ओळख, पृ.क्र. २४२.
प्रधान, ग.प्र., आगरकर लेखसंग्रह, पृ.क्र. १८१–१८३.

१६) सहस्त्रबुध्दे, पु.ग., केसरीची त्रिमूर्ती, पृ.क्र. १७६.
प्रधान, ग.प्र., आगरकर लेखसंग्राज, पृ.क्र. १८४–१९०.

१७) सहस्त्रबुध्दे, पु.ग., केसरीची त्रिमूर्ती, पृ.क्र. १७७.
प्रधान, ग.प्र., आगरकर लेखसंग्रह, पृ.क्र.१८८–१९०.